



Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com






वर्ष २ रे | अंक : ६३२ . वा | मंगळवार | दि. १९ डिसेंबर २०२३ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये


# जिजाऊ बँकेतील भ्रष्टाचाराचा मुद्दा थेट विधिमंडळात गाजला...

## आमदार उमाताई खापरे यांनी उपस्थित केला मुद्दा, मंत्र्यांचे वळसे घेत उत्तर..

## विधान परिषद उपसभापतींनी व्यक्त केली नाराजी, दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजच्या लढ्याला मोठे यश...

**जिजाऊ कमर्शियल अमरावती बँकेचा प्रताप भाग-२०३**

**जनसंचलन/ बुलढाणा**

जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक अमरावती या संस्थेत सुरू असलेल्या अनिर्बंध भ्रष्टाचाराचा मुद्दा सोमवार १८ डिसेंबर रोजी विधान परिषदेत चांगलाच गाजला. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या वतीने गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या पाठपुराव्याला यामुळे भलेमोठ यश प्राप्त झाले. आमदार उमाताई खापरे यांनी या मुद्द्यावरून लक्षवेधी उपस्थित केली. या प्रश्नाला सहकार मंत्र्यांनी मात्र बरेच वळसे घेत उत्तर दिल्याने विधान परिषद उपसभापती नीलमताई गोऱ्हे यांनीही नाराजी व्यक्त केल्याचे दिसून आले.सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या वतीने गेल्या अनेक महिन्यांपासून जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँकेचे अध्यक्ष अविनाश अंबादास कोठाळे व त्यांच्या काही संचालकांकडून जो काही अनिर्बंध भ्रष्टाचार, गैरव्यवहार आणि नियमबाह्य कामे सुरू आहेत, त्याविरोधात सातत्याने आपल्या वृत्तमालिकेतून प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. एव्हढेच नाही तर सातत्याने सर्व सरकारी पातळ्यांवर बँकेतील भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई करण्यासंदर्भात प्रयत्न केलेले आहेत. या सर्वांचा आता एकत्रित परिणाम दिसून येऊ लागला आहे. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजच्याच पाठपुराव्यामुळे सध्या बँकेची विविध पातळ्यांवर चौकशी सुरू आहे. परंतु केवळ चौकशी, चौकशी आणि चौकशीच, अशी स्थिती या बँकेसंदर्भात दिसून येत आहे. त्यामुळे हा मुद्दा विधिमंडळाच्या पटलावर पोहोचावा, यासाठीही दैनिक जनसंचलनचा सातत्याने प्रयत्न सुरूच होता. सध्या विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपूर विधान भवनात सुरू आहे. सोमवारी आमदार उमाताई खापरे यांनी मुद्दा उपस्थित करून या बँकेतील गैरव्यवहार विधिमंडळाच्या पटलावर ठेवण्याचा प्रयत्न केला. आमदार उमाताई खापरे यांनी बँकेची सातत्याने चौकशी सुरू असून, कारवाई होत नसल्याची तक्रारही केली. त्यांच्या तक्रारीवर उत्तर देताना सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी बँकेच्या कारभाराची विविध पातळ्यांवर सुरू असलेल्या चौकशीसंदर्भात माहिती दिली. त्यानंतर

**जिजाऊ बँक अमरावती निवडणूक उद्योजक राजेंद्र जाधव यांचा उमेदवारी अर्जावर हायकोर्टात सुनावणी सहकार आयुक्तांच्या निर्णयाला स्टे उमेदवारीअर्जबादठरविण्याचानिर्णयकायम अविनाश अंबादास कोठाळे यांच्या सहकार पॅनलला हायकोर्टाचा मोठा दणका**

या विषयावर उपसभापती नीलमताई गोऱ्हे यांनी तीव्र नापसंती व्यक्त केली. या वेळी गोऱ्हे म्हणाल्या की, एखाद्या बँकेच्या गैरव्यवहारासंदर्भात चौकशी करण्यास १३ महिन्यांचा कालावधी लागतोच कशाला. या मुद्द्यावरून मंत्री वळसे यांनी सांगितले की, अशा प्रकारच्या चौकशांमध्ये हा थोडा वेळ लागतोच. परंतु तरीही मी स्वतः या प्रकरणात लक्ष घालून ही चौकशी लवकरात लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो.व संबंधित दोषींवर कारवाई होईलच या संपूर्ण परिस्थितीवरून आता हे स्पष्ट होत चालले आहे की, महाभ्रष्टाचारी अध्यक्ष अविनाश अंबादास कोठाळे व त्यांच्या काही




लुटारू संचालकांची आता बँकेतील सद्दी संपत चालली आहे. या सर्वांच्या भ्रष्टाचाराचा घडा आता पूर्णपणे भरला आहे. गेल्या अनेक वर्षांमध्ये कोठाळे व त्यांच्या काही नालायक संचालकांनी जो काही धुडगूस बँकेच्या कामकाजात घातला आहे, त्या सर्वांची आता चौकशी होऊन त्यांच्यावर कारवाई होणार, हे निश्चित होत चालले आहे.


उर्वरित पान २ वर...


## डॉ. पंजाबराव देशमुख शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंती वर्षानिमित्त श्री पुंडलिक महाराज महाविद्यालयात विविध कार्यक्रमाचे आयोजन...



**जनसंचलन/ नांदुरा**

श्री. शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित श्री पुंडलिक महाराज महाविद्यालय, नांदुरा रेल्वे, जि. बुलडाणा येथे कृषिरत्न तथा शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२५ व्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंती वर्षा निमित्त दिनांक २५ ते २७ डिसेंबर २०२३ दरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्ष मोठ्या थाटामाटात साजरे केले जात आहे. त्या अनुषंगाने श्री पुंडलिक महाराज महाविद्यालयात जिल्हास्तरीय वादविवाद स्पर्धा, तालुकास्तरीय निबंध स्पर्धा, कृषी प्रदर्शनी, आनंद मेळावा, पुष्प प्रदर्शनी व रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. नांदुरा तालुक्यातील शालेय व तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये, प्रदर्शनीमध्ये जास्तीत जास्त संख्येने सहभाग नोंदवून स्वतःच्या कलागुणांना वाव द्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप हांडे यांनी केले आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी अथक परिश्रम घेत आहेत.



# तुपकरांच्या नेतृत्वात आज अधिवेशनावर हल्लाबोल आंदोलन: शेतकऱ्यांची फौज नागपुरकडे रवाना...

**जनसंचलन/बुलढाणा**

राज्यातील सोयाबीन, कापूस उत्पादकांच्या मागण्यांवर शब्द देऊनही कार्यवाही होत नसल्याने रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वात शेतकरी नागपूर हिवाळी अधिवेशनावर हल्लाबोल करण्यासाठी आज रवाना झाले. समृद्धी महामार्गाने हे शेतकरी मेहकर येथून मार्गस्थ झाले. येलो मोझॅक,बोंडअळी व पावसात खंड पडल्याने झालेल्या नुकसानीपोटी १०० टक्के नुकसान भरपाई मिळावी, सोयाबीन-कापसाला दरवाढ मिळावी,पिकविम्याची १०० टक्के अंतिम रक्कम लवकर मिळावी, यासह अन्य मागण्यांसाठी रविकांत तुपकरांच्या नेतृत्वाखाली गेल्या २ महिन्यांपासून सोयाबीन-कापूस उत्पादक शेतकरी रस्त्यावर उतरला आहे. एल्गार रथयात्रा, २० नोव्हेंबर रोजी बुलढाण्यात झालेला एल्गार महामोर्चा, सोमठाणा येथे रविकांत तुपकरांचे अन्नत्याग आंदोलन व मुंबईत मंत्रालय ताब्यात घेण्यासाठी हजारो शेतकऱ्यांनी दिलेली धडक या सर्व आंदोलनांची दखल घेत राज्य सरकारने २९ नोव्हेंबर रोजी शेतकऱ्यांशी मुंबईत चर्चा केली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत बहुतांश मागण्या त्यांनी मान्य केल्या होत्या. त्यानंतर सोयाबीन-कापूस दरवाढीसंदर्भात केंद्रीय वाणिज्यमंत्री पियूष गोयल व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत ९ डिसेंबरला मुंबईत दुसरी बैठक झाली. काही बाबींसाठी सरकार सकारात्मक असल्याचे बैठकीत केंद्रीय मंत्री गोयल यांनी सांगितले. मागण्यांची अंमलबजावणी करण्यासाठी शेतकऱ्यांनी सरकारला १५ डिसेंबरची मुदत दिली होती. ती मुदत संपली असून सरकारने अद्याप शेतकऱ्यांच्या मागण्यांसंदर्भात



अंमलबजावणीला सुरवात न केल्याने शेतकऱ्यांनी पुन्हा एकदा आंदोलनाचे हत्यार उपसल्याचे सांगितले जाते. ठरल्यानुसार आज दिनांक १८ डिसेंबर रोजी समृद्धी महामार्गावरील मेहकर जवळील फर्दापूर टोल येथून शेतकरी नागपूरच्या दिशेने रवाना झाले. मंगळवारी१९ डिसेंबर रोजी सकाळी अधिवेशनावर हल्लाबोल आंदोलन करणार आहेत. शेतकऱ्यांच्या संयमाचा अंत बघू नका, अन्यथा महागात पडेल, असा इशारा रविकांत तुपकरांनी यावेळी दिला.

# पान १ वरून जिजाऊ बँकेतील भ्रष्टाचाराचा...

या स्थितीत कोठाळे व त्यांच्या संचालकांचे धाबे दणाणले असून, आगामी काळात नेमके या चौकशीतून काय बाहेर येईल, हे स्पष्ट होईलच. परंतु तत्पूर्वी आम्ही ही बँक वाचवण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या सर्वांना आमचे आवाहन आहे की, सर्वांनी जोरदारपणे प्रयत्न करून बहुजनांच्या हितासाठी स्थापन करण्यात आलेली ही बँक पुन्हा एकदा महाभ्रष्टाचारी कोठाळे व त्यांच्या लुटारू संचालकांच्या जुलमी पंजातून बाहेर काढणे गरजेचे आहे. एव्हढेच नाही तर आमचे सरकारला हेही सांगणे आहे की, कोठाळेंसारख्या भ्रष्टाचाऱ्यांना पुन्हा या बँकेवर संचालक होण्यापासून तात्काळ रोखले जावे. तसे झाल्यासच ही बँक वाचू शकते. अन्यथा या बँकेला भविष्यात कोणीही वाचवू शकणार नाही. त्या दृष्टीने दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सातत्याने प्रयत्न करीत राहणार आहे. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन या माध्यमातून राज्याचे सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनाही आवाहन करीत आहे की, या बँकेत गेल्या अनेक वर्षांपासून भ्रष्टाचाराने प्रचंड धुडगूस घातला आहे.अविनाश अंबादास कोठाळे व त्यांच्या काही नालायक संचालकांनी या बँकेत अनेक गैरव्यवहार व भ्रष्टाचार केलेला आहे. त्यातून स्वतःच्या तुंबड्या भरण्याचे काम केले आहे. सर्वसामान्य ठेवीदार, खातेदार, भागधारक यांच्या हिताला या बँकेचे संचालक मंडळ बाधा पोहोचवत आहे. त्यामुळे जोपर्यंत बँकेच्या प्रशासनातून ही घाण दूर केली जात नाही, तोपर्यंत या बँकेला वाचवणे शक्य नाही. त्यामुळे सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी यात जोरदार सक्रियता दाखवावी, अशी अपेक्षा या निमित्ताने आम्ही व्यक्त करीत आहोत.

# राजे छत्रपती कला महाविद्यालय येथे अल्पसंख्यांक दिन साजरा




**जनसंचलन /मोताळा**

तालुक्यातील धामणगाव बढे येथील राजे छत्रपती कला महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने अल्पसंख्यांक दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राध्यापक शशिकांत शिरसाठ होते तर प्रमुख अतिथी म्हणून डॉक्टर स्वप्नील दांदळे, डॉ. कामिनी ह्या होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक डॉक्टर गोविंद गायकी यांनी प्रास्ताविक केले.

यात्रसंगी निबंध वाचन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये सरिता बडे व तन्वी काठोळे यांचा प्रथम क्रमांक, द्वितीय क्रमांक कुमारी आरती सोनवणे तर तृतीय क्रमांक दीक्षा वाकोडे व स्नेहल हुडेकर यांना विभागून देण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉक्टर स्वप्नील दांदडे यांनी अल्पसंख्यांक यांचे हक्क यावर प्रकाश टाकला तर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राध्यापक शशिकांत शिरसाठ यांनी ही या कार्यक्रमा विषयी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉक्टर गजानन वानखेडे यांनी केले.

# धारावी पुनर्विकास प्रकल्पात कोणत्याही एका व्यक्तीचा नव्हे तर सामान्य माणसाचा फायदा होईल: मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**वृत्तसंस्था/मुंबई**

विरोधी पक्षातील काहींच्या मनाप्रमाणे घडत नसल्यामुळेच ते सरकारच्या विरोधात मोर्चे काढत आहेत, असा आरोप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी केला. त्यांच्या बोलण्याचा रोख अप्रत्यक्षपणे शिवसेना (उबाठा) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर होता. ङ्गआमचे सरकार धारावीकरांना पूर्णपणे न्याय देईल. धारावीकरांच्या विकासात कोणत्याही व्यक्तीचा वैयक्तिक फायदा होणार नाही. धारावीतील प्रत्येक माणसाचा आम्ही फायदा करूफ असा पुनरुच्चारही मुख्यमंत्र्यांनी केला.





मुंबईतील वेगवेगळ्या भागात मुख्यमंत्री शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वच्छता मोहीम राबविण्यास सुरुवात करण्यात आली. यावेळी बोलताना मुख्यमंत्र्यांनी ङ्गधारावी बचावफ्या नावाखाली उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शनिवारी काढण्यात आलेल्या मोर्चावर टीका केली. ङ्गकाल काढलेला विकासविरोधी मोर्चा होता. धारावी आशिया खंडातील मोठी झोपडपट्टी आहे. धारावीकर कोणत्या परिस्थितीत राहतात हे मुंबईकरांना ज्ञात आहे. धारावीतील प्रत्येक नागरिकाचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांना चांगल्या मूलभूत सोयसुविधा देण्याची सरकारची भूमिका आहेफ असे शिंदे म्हणाले.धारावी विकास प्रकल्पाच्या यापूर्वीच्या कंत्राटदाराचे कंत्राट कशासाठी रद्द करण्यात आले. तुमचा अदानी यांना विरोध असेल, तर यापूर्वीच्या कंत्राटदारालाही का विरोध होता. मला वाटते की काही तडजोडी फिसकटल्या असतील. त्यामुळे हे सर्व काही घडत असेलफ, असा आरोपही मुख्यमंत्र्यांनी केला. दरम्यान, ओबीसींसह अन्य समाजाचे आरक्षण काढणार नाही. ओबीसी प्रवर्गाचे आरक्षण कमी न करता मराठा आरक्षण देण्यात येईल यावर सरकार ठाम आहे, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी आवर्जून सांगितले.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मराठा आरक्षणासाठी वेट अँड वॉच; २३ डिसेंबरला ठरणार दिशा, अल्टिमेटमबाबत काय म्हणाले मनोज जरांगे?

**जनसंचलन/ छत्रपती संभाजीनगर**

राज्यात ५४ लाख कुणबी नोंदी सापडल्या असून, राज्य सरकारने कायदा मंजूर करून मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात आरक्षण द्यावे. आरक्षण आंदोलनाची दिशा २३ डिसेंबरला जाहीर सभेत घोषित करण्यात येईल. या सभेत तीन कोटी मराठा बांधव सहभागी होणार आहेत,फ असे मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली येथे रविवारी सांगितले. सरकारला दिलेल्या २४ डिसेंबरच्या मुदतीत एक तासही कमी होणार नाही. न्यायासाठी आम्ही राजधानी मुंबईतही आंदोलन करू शकतो, असा इशारा जरांगे यांनी दिला. मराठा आरक्षण आंदोलनाची रणनीती ठरविण्यासाठी मनोज जरांगे यांनी रविवारी अंतरवाली (ता. अंबड) येथे राज्यस्तरीय बैठक घेतली. आंदोलनाचे आयोजक, स्वयंसेवक, वकील, डॉक्टर, व्यावसायिक, साहित्यिक यांच्या उपस्थितीत जरांगे यांनी आरक्षणावर चर्चा केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सोमवारी (१८ डिसेंबर) हिवाळी अधिवेशनात मराठा आरक्षणावर भूमिका मांडणार आहेत. मुख्यमंत्र्यांची भूमिका समजून घेऊन त्यानंतर निर्णय घेण्यासाठी जरांगे यांनी आंदोलनाची दिशा २३ डिसेंबरला जाहीर करणार असल्याचे सांगितले. त्यापूर्वी चार तास राज्यभरातील लोकांशी त्यांनी संवाद साधला. ङ्गओबीसी आरक्षणात जाण्यासाठी सरकारी नोंदी आवश्यक आहे. मंत्री गिरीश महाजन यांनी दिलेल्या माहितीनुसार, ५४ लाख कुणबी नोंदी सापडल्या आहेत. त्यामुळे मराठा समाज ओबीसी प्रवर्गात जाऊ शकतो. या प्रवर्गात येण्यास कुणी विरोध करू शकत नाही. विरोधकांकडे दुर्लक्ष करून सरकारी स्तरावर ओबीसी प्रवर्गात जाण्यासाठी प्रक्रिया करा. नवीन नोंदीनुसार मराठा समाज ओबीसी प्रवर्गात जाणार आहे. या आरक्षणामुळे एससी आणि एसटी आरक्षणाला धक्का लागत नाही. एनटी, व्हीजेएनटी आरक्षणातील वंजारी आणि धनगर बांधवांच्या आरक्षणालाही धक्का लागत नाही. कारण ओबीसीतून त्यांचा वेगळा प्रवर्ग आहे. इतर समाजाचे नुकसान करणार नाही. आरक्षण देण्यासाठी राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे. मतांच्या राजकारणासाठी ओबीसी आरक्षणाला धक्का लागू देणार नाही, असे सरकारने म्हणणे ही मराठ्यांची फसवणूक आहे. ओबीसी आरक्षणासाठी आवश्यक नोंदी सापडलेल्या आहेत. मतांसाठी सरकारने आमच्याशी खोटे बोलू नये,फ असे जरांगे म्हणाले. नेते मराठ्यांच्या मतांवर मोठे होऊन इतरांना लाभ देणार असतील, तर चालणार नाही. नोंदी असताना दुसरे आरक्षण कशासाठी देता? आधीचे आरक्षण कायद्यावर टिकले नाही त्यामुळे वेगळे आरक्षण नको. हक्काचे ओबीसी आरक्षण मिळाले पाहिजे,फ असे जरांगे म्हणाले. ङ्गआम्ही हक्काचे आरक्षण मागत असल्यामुळे कुणावरही अन्याय होणार नाही,फ असे त्यांनी स्पष्ट केले.दरम्यान, अंतरवाली सराटी येथे यापूर्वी झालेल्या जाहीर सभेच्या जागेवर नियोजन बैठक पार पडली. राज्यभरातून लोक बैठकीला उपस्थित होते. सभेच्या



ठिकाणी ४०० पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त लावण्यात आला होता.राज्यात भरपूर नोंदी सापडल्या, पण मराठवाड्यात कमी कुणबी नोंदी सापडल्या आहेत. कानाकोपऱ्यातील मराठा समाजाला आरक्षण समजले पाहिजे. न्या. शिंदे समितीने ५४ लाख नोंदी शोधल्या आहेत. या समितीने २४ डिसेंबरला काम थांबवू नये, तर काम सातत्याने सुरू ठेवावे. कारण, काही भागात नोंदीच सापडल्या नाहीत. नायगाव तालुक्यात अधिकाऱ्याने निरंक अहवाल पाठवला. पण लोकांनी अभ्यासक आणून नोंदी शोधल्या आहेत. काही अधिकारी खोडसाळ आहेत,फ असे मनोज जरांगे म्हणाले.

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तहसीलदार,उपविभागीय अधिकाऱ्यांनी केले आंदोलन...





**जनसंचलन/बुलढाणा**

आश्वासनाची आठवण करून देण्यासाठी उप विभागीय अधिकारी, तहसीलदार व नायब तहसीलदार यांचे जिल्हाधिकारी यांना स्मरण पत्र व कार्यालयासमोर दोन तासाचे आंदोलन. बुलडाणा जिल्हाधिकारी कार्यालय येथे उप विभागीय अधिकारी, तहसीलदार व नायब तहसीलदार यांनी आज दिनांक १८/१२/२०२३रोजी ग्रेड पे वाढवून मिळणे बाबत केले दोन तासाचे लाक्षणिक आंदोलन. ग्रेड पे वाढविण्याबाबत मंजुरी मिळूनही प्रकरण वित्त विभागाकडे अडकुन पडल्याने राजपत्रित अधिकाऱ्यांमध्ये नाराजगी.

समकक्ष राजपत्रित ज्युनियर अधिकाऱ्यांचा ग्रेड पे अठ्ठेचाळीस शे तर विभागीय अधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार सारख्या राजपत्रित अधिकाऱ्यांचा ग्रेड पे त्रेचाळीस शे असल्याने महाराष्ट्र राज्य तहसिलदार व नायब तहसीलदार संघटनेच्या वतीने २७/११/२०२३रोजी जिल्हाधिकारी कार्यालयास निवेदन दिले होते ग्रेड पे अजूनही मंजूर झाला नसल्याने आज सकाळी ११:०० ते १:०० पर्यंत लक्षवेधी धरणे आंदोलन करून ग्रेड पे वाढविण्यात यावे करीता जिल्हाधिकारी यांना संघटनेच्या वतीने स्मरण पत्र देण्यात आले आहे. उप विभागीय अधिकारी राजेंद्र जाधव, उप जिल्हाधिकारी शरद पाटील, उप जिल्हाधिकारी सुरेश थोरात, उप जिल्हाधिकारी राजेंद्र पोळ तहसीलदार हेमंत पाटील, तहसीलदार माया माने, नायब तहसीलदार एच डी वीर, नायाब तहसीलदार संजय बनगाले, नायब तहसीलदार संतोष वीर, नायब तहसीलदार अमरसिंग पवार, पुरवठा अधिकारी सदाशिव शेलार , तहसीलदार रुपेश खंडारे, तहसीलदार सुरेश कव्हले, तहसीलदार प्रिया सुळे, तहसिलदार अभिजित जोशी, तहसीलदार विद्या गौर, तहसीलदार एम सी गायकवाड. नायब तहसीलदार योगेश्वरी परोलकर व ईतर राजपत्रित अधिकारी उपस्थित होते

## पत्रकार भगवान साळवे यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार पत्रकारिता पुरस्कार जाहीर

**जनसंचलन/सिंदखेडराजा**

पत्रकार क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल पुण्य नगरी तालुका प्रतिनिधी तथा व्हॉईस ऑफ मिडिया चे सिंदखेड राजा तालुका कार्याध्यक्ष भगवान साळवे यांना मातोश्री वच्छलाबाई गवई शैक्षणिक संस्था साखरखेर्डा व दैनिक महाराष्ट्र सारथी यांच्याकडून मनाचा डॉ बाबासाहेब आंबेडकर पत्रकरिता पुरस्कार जाहीर झाला आहे पत्रकार भगवान साळवे यांनी लोकमत एकमत या वर्तमानपत्रात उपसंपादक म्हणून काम केले आहे सध्या पुण्यनगरीमध्ये सिंदखेड राजा तालुका प्रतिनिधी म्हणून काम करत आहे त्यांनी अनेक प्रश्नाला वाचा फोडली आहे सामाजिक राजकीय लिखाण करून




शेतकऱ्यांचे प्रश्न त्यांनी आपल्या लेखणीतून मांडले आहेत गेली २५ वर्ष पत्रकारिता क्षेत्रांमध्ये त्यांनी आपला ठसा उमटवला आहे सदर पुरस्कार ३० तारखेला एका शानदार समारंभामध्ये प्रदान करण्यात येणार आहे त्यांना हा मानाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे

## तलवारीने कापला केक, चौघांविरोधात गुन्हे दाखल

**जनसंचलन/मोताळा**

वाढदिवसाला तलवारीने केक कापून तो समाजमाध्यमावर सार्वत्रिक करणे चौघांच्या अंगलट आले आहे. याप्रकरणी वाढदिवस साजरा करणाऱ्या मुलासह त्याच्या मित्रांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मोताळा तालुक्यातील धामणगाव बढे येथे हा प्रकार घडला, धामणगाव बढे येथील मोहन रमेश सपकाळ यांचा वाढदिवस मित्रांनी धूमधडाक्यात



साजरा केला. मात्र, केक धारदार तलवारीने कापणे व इन्स्टाग्राम आयडीवर शेअर करणे त्यांना महागात पडले. याप्रकरणी मोहन रमेश सपकाळ, सागर काटे, राहुल काटे, अविनाश वाघ यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# राज्यातील बळीराजाला दीड वर्षात ४४ हजार २७८ कोटी रुपयांची विक्रमी मदत – मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



वृत्तसंस्था/ नागपूर

दुष्काळ, अतिवृष्टी, अवकाळी पाऊस, पूर, गारपीट अशा प्रत्येक नैसर्गिक आपत्तीत आमचं सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहिले आहे. गेल्या दीड वर्षात आम्ही विविध योजनांच्या माध्यमातून बळीराजाला तब्बल ४४ हजार २७८ कोटी रुपयांची आतापर्यंतची विक्रमी मदत केली असून राज्यातील शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी टास्क फोर्सचं पुनर्गठन करण्याचा, धान उत्पादक शेतकऱ्यांना यावर्षी प्रति हेक्टरी २० हजार रुपये बोनस देण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानसभेत केली. महाराष्ट्रात प्रथमच कांद्याची महाबँक स्थापन करण्यात आल्याचे जाहिर करतानाच ङ्कछत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेच्या ङ्कछत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेमध्ये ४४ लाख शेतकऱ्यांना १८ हजार ७६२ कोटी इतका कर्जमाफीचा लाभ देण्यात आला. मात्र सॉफ्टवेअरमध्ये त्रुटी निर्माण झाल्याने ६ लाख ५६ हजार शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहीले. ६.५६ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी सभागृहात केली.अवकाळी पाऊस, गारपीट आणि एकंदरच बळीराजाच्या समस्यांसंदर्भात विधानसभेत विरा-`धी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी अल्पकालिन चर्चा उपस्थित केली होती. त्याला उत्तर देताना मुख्यमंत्री शिंदे बोलत होते. यावेळी ते म्हणाले, कृषि विभागाच्या प्रमुख योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना जुलै २०२२ पासून तब्बल १५ हजार ४० कोटींचा लाभ देण्यात आला आहे. शेतकरी हा विषय फक्त कृषि खात्याशी संबंधित नाही. तर, अनेक खात्यांशी समन्वय साधून बळीराजाला सर्वोतोपरी शाश्वत मदत करण्याचा आम्ही प्रयत्न करत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना देखील अनुदान देण्यास सुरुवात केली असून आतापर्यंत १४ लाख ३१ हजार शेतकऱ्यांच्या बँक खात्यात सुमारे ५ हजार १९० कोटी रुपये जमा करण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.महाराष्ट्रात प्रथमच कांद्याची महाबँक स्थापन केली आहे. आजच या प्रकल्पाचा शुभारंभ करण्यात आला आहे. ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर हे यासाठी मदत करत आहेत. न्यूक्लिअर तंत्रज्ञानाचा वापर करून कांदा इरॅडिशनचा हा पथदर्शी प्रकल्प कांदा उत्पादकांच्या समस्येवर कायमस्वरुपी उपाय ठरेल, असा विश्वास व्यक्त करीत समृद्धी महामार्गालगत १३ कृषी समृद्धी केंद्रांच्या उभारणीचे काम सुरू असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. कांदा निर्यातबंदीबाबत केंद्रीय वाणिज्यमंत्री श्री पियुष गोयल यांच्याशी चर्चा झाली असून याबाबतही लवकरच तोडगा निघेल, असेही त्यांनी सांगितले.ङ्कसहकार से समृद्धीफ हा मंत्र वास्तवात आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याची ग्वाही देतानाच इथेनॉल निर्मितीवर घातलेले निर्बंध राज्याच्या मागणीला मान देऊन शिथील केले, त्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय सहकारिता मंत्री अमित शहा यांचे आभारही मुख्यमंत्र्यांनी मानले.मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, शेतकरी आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा असून त्यांच्यासाठी जुलै २०२२ पासून म्हणजे गेल्या फक्त १८ महिन्यांत शेतकऱ्यांसाठी जो भरीव निधी खर्च करीत आहोत त्यामध्ये मदत व पुनर्वसन विभागाच्या माध्यमातून १४ हजार ८९१ कोटी रुपये, कृषि विभागाच्या माध्यमातून १५ हजार ४० कोटी रुपये, सहकार ५ हजार १९० कोटी, पणन ५ हजार ११४ कोटी, अन्न व नागरी पुरवठा ३ हजार ८०० कोटी,पशुसंवर्धन २४३ कोटी अशा रीतीनं तब्बल ४४ हजार कोटींपेक्षा जास्त खर्च करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

# दोन तृतीयांश आमदार पाठीशी, म्हणून पक्ष तुमचा होत नाही, शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणी ठाकरे गटाचा युक्तिवाद



वृत्तसंस्था/ नागपूर

शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणात नागपुरात सुनावणीला सुरुवात झाली आहे. यावेळी उद्धव ठाकरे गटातर्फे वरिष्ठ अधिवक्ते देवदत्त कामत यांनी युक्तिवाद केला. व्हीप काढण्याचा अधिकार हा राजकीय पक्षाला आहे, विधिमंडळ पक्षाला नाही. पक्ष आमचाच असल्याचे शिंदे गटाचे दावे आणि व्हीप बजावण्याचे प्रकार कायद्याला अनोळ-खी आहेत, असे यावेळी उद्धव ठाकरे गटातर्फे सांगण्यात आले. निवडणूक आयोगाने म्हटले म्हणून शिंदे गट शिवसेना हा पक्ष आमचा आहे, असे म्हणू शकत नाही. एका बैठकीला उपस्थित नाही राहिले, म्हणून सदस्यत्व रद्द होऊ शकते, असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. शिवसेना विधिमंडळ पक्षाने एकनाथ शिंदे यांची गटनेता आणि भरत गोगावले यांची प्रतोदपती नियुक्ती केली. पण हा निर्णय राजकीय पक्षाचा होता की नाही हे उपाध्यक्ष यांनी तपासून पहायला हवे होते. पक्ष म्हणजे काय तर पदाधिकारी. पक्षाचे प्रतिनिधी म्हणजे केवळ नोंदणीकृत पदाधिकारी असतात. प्रत्येक कार्यकर्ता हा प्रतिनिधी नाही. तुम्हाला नेतृत्व आवडत नाही, तर त्याविरुद्ध राष्ट्रीय कार्यकारिणीच्या किंवा प्रतिनिधी सभेत मुद्दा मांडला होता का? असा सवाल ठाकरे गटातर्फे विचारण्यात आला. तुमच्याकडे जास्त आमदार आहेत म्हणून पक्ष तुमचा होत नाही. दोन तृतीयांश आमदार आहेत म्हणून तुम्हाला पक्ष मिळत नाही. नवा पक्ष स्थापन करा अथवा विलीन व्हा हाच पर्याय आहे. तर दोन तृतीयांश आमदार अपात्र ठरणार नाहीत त्यांना वेगळी ओळख घेता येईल.एकनाथ शिंदे यांना गटनेता आणि भरतशेठ गोगावले यांना प्रतोद करण्यात आले. उरलेले एक तृतीयांश आमदार मूळ पक्षाचे प्रतिनिधी असतात. नियमानुसार फक्त सभागृहात दोन्ही गटांना अपात्रतेपासून संरक्षण मिळते. पण राजकीय पक्ष आणि विधिमंडळ पक्ष यात फरक आहे. व्हीप काढण्याचा अधिकार हा राजकीय पक्षाला आहे, विधिमंडळ पक्षाला नाही. पक्ष आमचाच असल्याचे शिंदे गटाचे दावे आणि व्हीप बजावण्याचे प्रकार कायद्याला अनोळखी आ-हेत, असंही ठाकरे गटातर्फे सांगण्यात आले.तुम्ही पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत मतदान करून उद्धव ठाकरे यांना बाजूला करा. पण राजकीय डावपेच करून तुम्ही कायद्याने घालून दिलेल्या तरतुदीचे उल्लंघन करू शकत नाही. शिंदे गटाने उल्लंघन केले. पक्षात बदल करण्याची प्रक्रिया आहे, प्रतिनिधी सभा बोल-वावी लागते, ठराव घ्यावा लागतो, आयोगाला कळवावे लागेल, दहा जण एकत्र येऊन आम्हीच पक्ष आ-होत असे म्हणू शकत नाही, असेही ठाकरे गटाकडून सांगण्यात आले.

# अग्रीम पिक विमा वितरित करत असताना बुलढाणा जिल्ह्याला सर्वात कमी रक्कम...




जनसंचलन/ सिंदखेडराजा

विधान भवनामध्ये सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ राजेंद्र शिंगणे यांनी अग्रीम पिक विमा वितरित करत असताना बुलढाणा जिल्ह्याला सर्वात कमी रक्कम इतर जिल्ह्यांच्या तुलनेत मिळाली आहे त्याची कारणे काय व यावर शासन स्तरावर काय निर्णय घेतला जाईल याबद्दलचा प्रश्न उपस्थित केला. तसेच शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये पीक विम्याची रक्कम जमा झालेली असताना त्यावर काही बँकांनी होल्ड लावलेला आहे त्यावर काय कारवाई करणार? असे प्रश्न आमदार डॉक्टर राजेंद्र शिंगणे यांनी उपस्थित केले असता माननीय कृषिमंत्री ना. धनंजय मुंडे यांनी अग्रीम पिक विमा बाबत सविस्तर माहिती घेऊन कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे. तसेच ज्या बँकांनी शेतकऱ्याच्या पिक विमा रकमेवर होल्ड लावले आहेत त्या त्यांच्यावर कार्यवाही करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना देणार असून जर त्यांच्याकडून कारवाई झाली नाही तर स्वतः शासन अशा बँकांवर कारवाई करेल असा शब्द देखील यावेळी त्यांनी उत्तरामध्ये दिला.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958

बॉक्स

वृत्तपत्र आणि चांगली माणसं लगेच कळत नाही त्याला वाचाव लागत

जिल्हावासियांचा बुलंद आवाज

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

जाहिरात द्या व प्रचंड प्रतिसादाचा अनुभव घ्या...



व्यवसायिक,प्रतिष्ठाने, Wanted, पाहिजेत, ऑफर, सेल इत्यादी

| 8x8 cm | 5x8 cm | 5x8 cm |
|---|---|---|
| 1 Month=5000/- | 1 Month=3500/- | 1 Month=3500/- |
| 15 Day=3500/- | 15 Day=2200/- | 15 Day=2200/- |
| 7 Day=2000/- | 7 Day=1500/- | 7 Day=1500/- |
| Hight 8 cm, Width 8 cm | Hight 5 cm, Width 8 cm | Hight 5 cm, Width 23 cm |

एक दिवसाची जाहिरातः वाढदिवस शुभेच्छा, उद्घाटन, शुभारंभ, समारंभ, शुभविवाह इ.

One Day
Full Page= 8000/-
1/2 Page= 5000/-

| 2600/- | 1800/- | 1300/- |
|---|---|---|
| Hight 12 cm, Width 12 cm | Hight 8 cm, Width 10 cm | Hight 8 cm, Width 8 cm |

T&C Apply

सुचना, नावात बदल, टी.सी. किंवा कागदपत्रे हरविली आहेत तसेच जाहीर प्रकटन इत्यादी
केवळ ३५०/- रु.

- जाहिरातीचे मॅटर तयार नसल्यास डिझाईनसाठी अतिरिक्त २००/- रुपये चार्ज पडतील.
- पूर्ण रक्कम ॲडव्हान्स दिल्यास एकुण रकमेत ५ टक्के सुट
- प्रथम पानावरील जाहिरातीसाठी १० टक्के अतिरीक्त चार्ज पडेल

विशेष सूचना- आपल्या जाहिराती आमच्या सोशल मिडीया अकाउंटला ही नि:शुल्क झळकतील

न्यायालय तसेच धर्मदाय आयुक्तांच्या जाहीर नोटीस
फक्त ५०० रुपये

अधिक माहितीसाठी संपर्क:
अजय राजगुरे-9922359674
ऑफिस नं.-9129582958
पत्ता- शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स कारंजा चौक,बुलडाणा
Mail Id: jansanchlan@gmail.com